वाहतुकीसाठी वापर केला जाई.

Unit IV

## शिवाजी महाराजांचे व्यापार वाणिज्य धोरण

### 1) व्यापारी वर्गाविषयी धोरण :

छत्रपती शिवाजी महाराज एक कुशल प्रशासक होते. राज्य प्रबळ होण्यासाठी राज्याच्या आर्थिक पाया मजबूत असणे गरजेचे असते हे महाराजांनी ओळखले होते. त्यामुळेच त्यांनी

आपले धोरण दरवील महाराजांचा व्यापारविषयक धोरणाची माहिती आपणास त्यांच्या आष्टप्रधान मंडळात सदस्य असणाऱ्या रामचंद्रपंत आमात्य याच्या आज्ञापत्र या ग्रंथामधून मिळते अमात्य व्यापाऱ्यांना सावकार असे म्हणतात.

1) सरकार म्हणजे राज्याच्या व राजश्रीचि शोभा
2) साहुकाराच्या योगाने राज्य आबादान होते.
3) राज्य श्रीमंत होते
4) पडले संकट परिहार होते
5) साहुकाराचे संरक्षणामध्ये बहुत फायदा आहे
6) या करिता सावकाराचा बहुमान चालवावा
7) कोणेविषयी त्याजवर जुलूम अथवा त्याचा अपमान होऊ न द्यावा.
8) पेठापेठांत दुकाने वख्यारी घालुन हर्ती, घोडे वस्तो ..... यांचा उदीम चालवावा
9) हुजूरबागमध्ये (मुख्य बाजार) थोर थोर सावकार आणून ठेवावे.
10) वयावर्दी साहुकार यांसही बेबदर्शी कौल (निमंत्रण) पाठवून आमदानी करवावी.

2) युरोपियन व्यापाऱ्यांविषयी सावधानतेचे धोरण :

स्वराज्यातील व्यापारांबरोबर परप्रांतातील बहुमान करणार छत्रपती शिवाजी महाराज युरोपियन व्यापाराबद्दल सावधानतेचे धोरण स्वीकारतात रामचंद्रपंत आमात्य महाराजांचे धोरण आपल्या आज्ञापत्रात विशद करताना म्हणतात टोपीकर हेही लोक सावकारी करतात परंतु ते वरकड सावकारासारखे नव्हेत त्यांचे खावंद (मालक) प्रत्येक प्रत्येक राज्यात करीत आहेत त्यांचे हुकमाने त्यांचे होईल हे लोक या प्रांती साहुकारीस (व्यापारासाठी) येतात राज्य करणारास स्थळ लोभ नाही असे काय

प्रांती साहुकारीस (व्यापारासाठी) येतात राज्य
करण्यासाठी. तथापि टोपीकरांस या प्रांती प्रवेश
करावा राज्य वाढवावे स्वमत प्रतिष्ठावे हा पूर्ण
अभिमान त्यावरही हट्टी आन होतात आले
स्थळ मेहिल्याने सोडवयाचे नव्हते, त्यांची आदम
कतरी आलो गेलो शत्रूंच नोंद असतो
ह्यावी त्यास केवळ नेहमी जागा देऊ
नये.

## स्वदेशी मालास संरक्षण

छत्रपती शिवाजी महाराजांची अर्थनीती
अत्यंत अभ्यासपूर्ण होती स्वराज्याच्या आर्थिक
स्वावलंबनासाठी त्यांनी स्वदेशी मालास संरक्षण
देण्याचे धोरण स्विकारले करवत्यांच्या ठिकाणी
असणाऱ्या बाजारपेठांची व्यवस्था उत्तम प्रकारे
केली त्यासाठी आवश्यक त्या अधिकाऱ्यांची
नियुक्ती केली बाजारपेठांची विकासासाठी व
व्यापाराच्या वाढीसाठी महाराजांनी व्यापारी वर्गाला
अनेक सवलती व जकातीमध्ये सुट दिली
रायगड व रायगडावरील बाजारपेठ प्रसिद्ध
आहे.

प्रदेशात किंवा परप्रांतातून स्वराज्यात येणाऱ्या
मालाशी स्वराज्यातील मालाला स्पर्धा करावी लागे
स्वदेशी मालास संरक्षण देण्याचे धोरण आज सर्व
जगभर अवलंबिले जाते त्यास संरक्षण जकात
धोरण असे म्हणतात छत्रपती शिवाजी महाराजांनी
स्वदेशी मालास संरक्षण देण्याचे धोरणाचा अवलंब
१७ व्या शतकात केला होता आणि याबाबतचे
उत्तम उदाहरण म्हणजे स्वराज्यात तयार होणाऱ्या
मिठास दिलेले संरक्षण होय.

1.2.3 (उदयोग

## शिवकालीन गावगाड्यातील व्यवसाय :

स्वावलंबन हे ग्रामीण जिवनाचे वैशिष्ट्ये होय शेती हा मुख्य व्यवसाय असल्याने त्याच्या विकासासाठी इतर अनेक उपव्यवसाय ग्रामीण भागात सुरु झाले आणि शेतकऱ्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण होऊ लागल्या कारागिरांनी गावातच रहावे याची काळजी घेतली जाऊ लागली गावकरी कारागिरांना मोबदला म्हणून आवश्यक ते धान्य आपल्या उत्पन्नातून देत असत तर काही ठिकाणी कारागिरांनी जमिन इनाम दिल्याची उदाहरणे पहावयास मिळतात.

गावाच्या विकास व स्थैर्यासाठी वतन दाराप्रमाणे बलुतेदारांची सेवा अत्यंत उपयुक्त असल्याचे दिसून येते. बलुतेदारांची सेवेची विभागणी मुख्यतत्वे तीन प्रकारात केली जाते.

1) व्यवसायिक सेवा देणारा वर्ग : सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी इ.

2) सेवा वर्ग : महार, मांग, तराळ, रामोशी इ.

3) धार्मिक सेवा देणारा वर्ग : जोशी, गुरव, ठाकुर मुलाणा इ.

प्रत्येक खेड्यामध्ये १२ बलुतेदार व १८ आलुतेदार असतीलच असे नाही परंतु आठवड्याचा बाजार भरणाऱ्या करसब्याच्या ठिकाणी अनेकविधी व्यवसाय करणारे व्यावसायिक दिसून येतात.

## 2. शिवकालीन उदयोग व्यवसाय

भारतात शेती बरोबरच अनेक प्रकारचे उदयोगधंदे प्राचीन काळापासून चालत आले होते. आर्थिकदृष्ट्या देश स्वयंपूर्ण होता त्यामुळे फारशी

Scanned by CamScanner